**प्रेसनोट** दि. 09/03/2026

# अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणेकडून बंडगार्डन पोलीस स्टेशन येथील पोलीस उप निरीक्षक यांचे विरोधात लाच मागणी प्रकरणी कारवाई केलेबाबत.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर **गु.रजि.नं.** 58/2026 |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे **कलम** 7, 7अ |
| तक्रारदार | पुरुष वय 40 वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | संदीप खेडकर, पद- पोलीस उपनिरीक्षक, नेमणूक - बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर, रा.ठी.फ्लॅट नं. बी1/504/ गंगा समृद्धी अपार्टमेंट,एस आर पी एफ नं.1 च्या 442 गेट जवळ, वानवडी, पुणे (वर्ग-2) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | एकुण 2,00,000/- (दोन लाख रूपये फक्त) |
| पडताळणी दरम्यान लाच मागणी | एकुण 1,00,000/- (एक लाख रूपये फक्त) |
| पडताळणी दिनांक | दि. 03/02/2026 |
| सापळा अधिकारी यांचे नाव व पद | श्रीमती निता मिसाळ, सहा.पोलीस आयुक्त, लाप्रवि,पुणे (मो.क्र. 9822214414) |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्री. प्रविण निबांळकर, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. 9552574140) |

**थोडक्यात माहिती :-** यातील तक्रारदार यांचे विरूद्ध बंडगार्डन पोलीस स्टेशन येथे फसवणुकीबाबत तक्रार अर्ज दाखल होता. सदर अर्जाची चौकशी आरोपी लोकसेवक PSI संदीप खेडकर हे करत होते. सदर अर्जावरून तक्रारदाराविरूद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल न करण्यासाठी पोलीस उपनिरीक्षक संदीप खेडकर हे तक्रारदाराकडे 2,00,000/- रूपये लाचेची मागणी करत असल्याची तक्रार तक्रारदाराने ला.प्र.वि. पुणे विभाग येथे दि. 03/02/2026 रोजी दिली होती.

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 03/02/2026 रोजी लाच मागणी पडताळणी केली असता पडताळणी दरम्यान आलोसे पोलीस उपनिरीक्षक संदीप खेडकर यांनी तक्रारदार यांचे विरुद्ध फसवणुकी संदर्भाने प्राप्त तक्रार अर्जामध्ये गुन्हा दाखल न करण्यासाठी पंचासमक्ष तसेच तक्रारदाराच्या वकीलासमक्ष तक्रारदाराकडे स्वतःकरिता व वरिष्ठांसाठी ताडजोडीअंती 1,00,000/- (एक लाख) रूपयाची लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

आरोपी लोकसेवक संदीप खेडेकर,पोलीस उपनिरीक्षक याच्याविरूध्द बंडगार्डन पोलीस स्टेशन पुणे शहर येथे गु.रजि.नं. 58/2026 कलम 7, 7 अ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 प्रमाणे दि.9/3/2026 रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823167154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.**

1) **अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक** -020-26122134, 26132802, 26050423, **9403781064**
2) **व्हॉट्स-अ‍ॅप क्रमांक -** 9403781064 (पुणे), 9930997700 (मुंबई)
3) **ई-मेलआयडी - पुणे** dyspacbpune@mahapolice.gov.in
4) **वेबसाईट** - www.acbmaharashtra.gov.in
5) **ऑनलाईन अ‍ॅप तक्रार** - www.acbmaharashtra.net.in

दयानंद गावडे
सहा.पोलीस आयुक्त / पो. उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.